# भारतीय लोकशाहीतील 'आयत्या बिळावरचे नागोबा' कोण?

*चर्चाशील राजकारणामध्ये सहभागी व्हायला नकार देऊन 'रालोआ'ने लोकशाही नियमांचा भंग केला आहे.*

सुरक्षित व प्रतिष्ठेचं जिणं जगू इच्छिणाऱ्या परिघावरील गटांनी केलेली निदर्शनं आणि त्यांनी उमटवलेले मतभिन्नतेचे सूरच लोकशाही नियमांना अबाधित ठेवतात आणि भारतीय राष्ट्राचा लोकशाही आशय अधिक संपन्न करतात, हे वेगळं अधोरेखित करायलाही नको. ही निदर्शनं अंगभूतरित्या लोकशाही स्वरूपाची आहेत. शिवाय, गरीबी, बेरोजगारी, ग्रामीण भागातील क्लेश, चिंता, भय व निराशा यांपासून स्वतंत्र होण्याची आसही त्यामध्ये आहे. या निदर्शनांचा आशय मन वळवण्याची क्षमता असणारा, विचारविनिमय घडवणारा अथवा चर्चाशील आहे. सर्वसामान्य लोकांचे युक्तिवाद लिखित संहितांमधून उगम पावलेले असतीलच असं नाही, पण सत्याच्या अंतःस्तरावरील गरजेतून ते उगवलेले असतात. उदाहरणार्थ, रोजगार मिळवण्याची गरजही याला कारणीभूत ठरू शकते मग तो रोजगार कितीही धोकादायक, कालबाह्य व नकोसं वाटावं इतके औदासिन्य निर्माण करणारा असला, तरीही तो मिळणे ही गरज असते. वाल्मिकी समुदायातील बहुतांश सदस्यांना गटारं साफ करण्यासाठी मॅनहोलमध्ये उतरणं सक्तीचं ठरतं, इतक्या पातळीवर ही असहायता असते. सभ्य कामाची अनुपलब्धता, या यातील एक भाग आहे. आणि दोन, आहे ती नोकरी दुसऱ्या कोणाच्या तरी वाट्याला जाईल, अशी भीतीही यात आहे. रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांचं तणावग्रस्ततेतून होणारं स्थलांतरही कोणत्याही प्रकारच्या कामाच्या शोधार्थच होत असतं.

सत्ताधारी पक्ष कोणताही असू दे, आपल्या नागरिकांना स्वातंत्र्याची हमी देण्यासाठी तणाव, चिंता व निराशा उत्पन्न करणारी परिस्थिती पूर्णतः दूर करण्याचं कर्तव्य सरकारने पार पाडायचं असतं. या पार्श्वभूमीवर, आपण नागरिकांच्या स्वातंत्र्याची हमी देत आहोत आणि लोकशाही नियमांना उचलून धरत आहोत, असा दावा करणाऱ्या कोणत्याही सरकारला आपल्या दिशेविषयी व कामकाजाविषयी चर्चाशील राहाण्यावाचून पर्याय नाही. चर्चाशील पद्धतीमधील विवेकाचा घटक कोणत्याही लोकशाहीधिष्ठित सरकारच्या लक्षात यायला हवा. युक्तिवादामध्ये वा चर्चेमध्ये सहभागी झालं तर मतदारांसमोर जाताना निवडणुकीय पाठिंब्यावरचा संबंधित पक्षाचा दावा वाढतो. आश्वासनांची पूर्तता करण्यात आपल्याला 'यश' आल्याचा एकतर्फी बचाव किंवा राष्ट्राच्या संरक्षण दलांच्या यशावर स्वतः डल्ला मारणं, यातून सरकारचा पुरस्कार केला जातो, पण त्यात आत्मचिंतनाचा अभाव असतो, अनेक महत्त्वाच्या अवकाशांमधील सरकारच्या अपयशांकडे डोळेझाक केलेली असते आणि मुख्य म्हणजे युक्तिवाद टाळून ही प्रशंसा केली जाते. इथे एक मुख्य प्रश्न उपस्थित करायला हवा : चर्चाशील लोकशाहीमध्ये युक्तिवाद/चर्चा हा घटक गाभ्याचा असतो, परंतु गेल्या पाच वर्षांमध्ये राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या (रालोआ) नेतृत्वाखालील केंद्र सरकारने अशा युक्तिवादाला फाटा द्यायचा किती मोठा प्रयत्न केला? मग हे सरकार लोकशाहीतील 'आयत्या बिळावर नागोबा' ठरणारं आहे, असं का म्हणू नये?

चर्चाशील पद्धतीमध्ये मतदारवर्गाला समजून घेणारा

संवाद होतो, ही एक अत्यावश्यक लोकशाही पद्धत आहे. दर आठवड्याला नभोवाणीवरून प्रसारित होणाऱ्या 'मन की बात' या कार्यक्रमाचा बराच गाजावाजा केला जातो. पण त्यातून उपरोल्लेखित लोकशाही आदर्श साध्य होईल अशी हमी देता येत नाही. 'लाखो' लोकांच्या मनातलं वाचण्याची विशेष ताकद पंतप्रधानांकडे आहे, अशा गृहितकावर हा कार्यक्रम सुरू झाला आहे, त्यामुळे त्यातून प्रतिक्रियेची शक्यता मंदावते. पंतप्रधानांशी चिकित्सक संवाद साधण्यासाठी इच्छुक प्रसारमाध्यमांसोबत बोलण्याची गरज यातून बाजूला सारली जाते. या कार्यक्रमात पंतप्रधान लोकांशी बोलत असल्याचं कोणाला वाटू शकतं, पण प्रत्यक्षात उच्च स्थानावरून ते खालील लोकांशी बोलत असतात. अशा प्रकारच्या 'संवादा'मध्ये विषमता अंतर्भूतच असते. 'मी आहे चौकीदार'सारख्या अभियानाचा भाग म्हणून पंतप्रधान जे हेतूपूर्वक संवाद साधत आहेत, त्यातूनही हे उघड होतं.

विचारविनिमय करणाऱ्या लोकशाहीमध्ये विरोधी नेत्यांसोबत चर्चा करणं, किंबहुना विरोधी नेत्यांना युक्तिवादासाठी निमंत्रित करणं, ही सत्ताधारी पक्षातील नेत्यांची जबाबदारी असते. परंतु, गेल्या पाच वर्षांमध्ये सरकारने आणि त्याच्या समर्थकांनी समाजमाध्यमांवर विरोधकांना ट्रोल करून, मनोबळ खच्ची करणारी भाषा वापरून, आणि युक्तिवाद करणारे आवाज शारीरदृष्ट्या संपवून टाकून चर्चेचे अवकाश मोठ्या प्रमाणात क्षीण केले. सत्ताधारी पक्षाच्या काही समर्थकांनी मनोबळ खच्ची करणारी भाषा वापरली आणि नंतर 'माझ्या बोलण्याचा चुकीचा अर्थ काढण्यात आला आहे' किंवा 'संदर्भाशिवाय माझं विधान वापरण्यात आलं आहे' अशी विधानं करून सारवासारव करायचा प्रयत्न केला. परंतु, अशा प्रकारच्या अभिव्यक्तीमध्ये नैतिक चुका असल्या तरी कायदेशीरदृष्ट्या ती दंडनीय ठरत नाही. अशा वारंवार होणाऱ्या चुकांमुळे इतरांच्या मनोबळाला बाधा पोचते, कारण त्या लोकांनाही अशीच भाषा वापरणं सक्तीचं होऊन जातं. महत्त्वाची माहिती व आकडेवारी सार्वजनिक अवकाशात उपलब्ध होण्याला पायबंद घालण्याचे प्रयत्न सरकारने केले, यावरूनही चर्चेबद्दल सरकारला वाटणारं भय स्पष्ट होतं.

इथेही एक प्रश्न उपस्थित करायला हवा : सत्ताधारी नेते अशी समोरच्याचं मनोबळ खच्ची करू पाहणारी भाषा का वापरतात? या नेत्यांना वेढून असलेल्या भयामध्ये सदर प्रश्नाचं उत्तर लपलेलं आहे. किंबहुना, चर्चाशील राजकारणापेक्षा प्रतीकात्मक राजकारणाला महत्त्व देऊन ते चर्चेला थोपवायचा प्रयत्न करतात. उदाहरणार्थ, रालोआ सरकारने राष्ट्रवादाभोवतीच्या प्रतीकात्मक राजकारणाचा अवाजवी वापर केला, त्यामुळे राष्ट्र व तिथले नागरिक यांच्यातील सहसंयोगी संबंधांची मांडणी करणारी राष्ट्रवादाची चैतन्यशील संकल्पना यशस्वीरित्या गोठवून ठेवण्यात आली. एखाद्या राष्ट्रातील लोकांचं स्थान काय आहे, यावर त्या राष्ट्राचं 'बलशाली' स्थान ठरत असतं. आरोग्य, शिक्षण, रोजगार व घरबांधणी यांमध्ये लोकांची स्थिती काय आहे, यावर प्रतिसादाभिमुख राष्ट्राची संकल्पना अवलंबून असते. ठोस चर्चा करण्यातील अपयशाला कोणतंही समर्थन उपयोगी पडत नाही. परंतु, लोकशाही आशयाला संपन्न करण्यात कोणतंही योगदान न देणारा असा एक राजकीय पक्ष पुन्हा सत्तेत येण्यासाठी लोकशाही निवडणुकांचाच वापर करणार आहे.

●


वर्गणी / लेख पाठवणे /पत्रव्यवहाराचा **नवा पत्ता**

परिवर्तनाचा वाटसरू, ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११, भ्र. ७७७६९०२२६७

# निवडणुकीचा प्रचार आणि बघ्यांची गर्दी

*निवडणुकींच्या संदर्भातील सध्या प्रचलित असलेलं संभाषित नागरिकांच्या कर्तेपणाला मर्यादा घालणारं आहे.*

सार्वत्रिक निवडणुकांचं वेळापत्रक जाहीर झालं आहे, त्यामुळे सत्ताधारी आघाडी आणि विरोधी पक्षांच्याही प्रचारमोहिमांनी वेग घेतला आहे. परंतु, सर्वसामान्य मतदारवर्गाच्या दृष्टीने कोणते प्रश्न या निवडणुकीत मध्यवर्ती ठरतील, हे या प्रचारमोहिमांच्या स्वरूपावरून आणि आशयावरून ठरणार आहे. जनतेच्या खऱ्याखुऱ्या चिंतांची अभिव्यक्ती या निवडणुकांद्वारे होईल का, हेही या प्रक्रियेत स्पष्ट होईल. समाजाची रचना लोकशाहीशी सुसंगत होण्यासाठी महत्त्वाचे ठरणारे प्रश्न आणि अशा प्रश्नांबाबतची सरकारची प्रतिसाद क्षमता, याबद्दल सामूहिक विचारविनिमय घडवण्याचं निमित्त प्रातिनिधिक लोकशाहीमधील निवडणुका पुरवत असतात. परंतु, अलीकडच्या काळातील निवडणुकांच्या प्रचारमोहिमा अशा विचारविनिमयाच्या वाहक राहिलेल्या नाहीत, कारण एखादं लक्षवेधक प्रदर्शन मांडावं किंवा प्रेक्षणीय क्रीडाप्रकार खेळला जावा तशा पद्धतीने प्रचारमोहिमा पार पडत असतात. निवडणुकांमध्ये विचारविनिमयावरील भर ओसरण्याचं कारण दोन प्रकारच्या प्रवृत्तींमध्ये दडलेलं आहे– राष्ट्राध्यक्ष पद्धतीच्या राज्यव्यवस्थेकडे वाढलेला ओढा आणि प्रशासनाचं वाढतं महापालिकाकरण, या त्या दोन प्रवृत्ती होत. यातून लोकशाहीचा आशय लोप पावत जातो.

राष्ट्राध्यक्ष स्वरूपाच्या रचनेचं अनुकरण केल्यामुळे केवळ पंतप्रधानपदाच्या उमेदवारावर किंवा पक्षाच्या वा आघाडीच्या 'चेहऱ्या'वर एककल्ली लक्ष केंद्रित होतं, त्यातून निवडणुकीतील वादचर्चा व स्पर्धा केवळ व्यक्तिमत्त्वांच्या स्पर्धेपुरत्या उरतात. महापालिकाकरण म्हणजे उमेदवारांनी मतदारसंघाच्या पातळीवर केलेली कामगिरी वा तत्संबंधीच्या वैशिष्ट्यांवर संकुचित लक्ष केंद्रित केलं जातं. यातील दुसरा मुद्दा प्रातिनिधिक लोकशाहीच्या तत्त्वाशी सुसंगतच आहे आणि त्याचा उगम विकेंद्रीकरणाच्या संभाषितातून झालेला आहे, असा युक्तिवाद काही जण करू शकतील. याउलट, पहिला मुद्दा उघडच केंद्रीकरणाच्या-हुकूमशाही प्रेरणा दाखवणारा आहे. परंतु हे दोन्ही प्रवाह जनतेच्या लोकशाही कर्तेपणाला छाटतात आणि विविध मार्गांनी त्यांना दुबळं करतात. राष्ट्राध्यक्षीय रचनेमध्ये लोकांनी त्यांची अधिसत्ता एका बलशाली केंद्रीय नेत्याकडे सोपवणं अपेक्षित असतं आणि त्या नेत्याची व्यक्तिगत कौशल्यं, क्षमता व मर्यादा हेच निवडीचे निकष असतात. एका नेत्यामध्ये निर्णायकता वा वक्तृत्वगुण आहे आणि दुसऱ्यात हे घटक नाहीत, किंवा एकामध्ये सभ्यता वा बुद्धिमत्ता आहे, तर दुसऱ्यात या गुणांचा अभाव आहे, अशा प्रकारच्या मुद्द्यांवर सार्वजनिक चर्चा फिरताना आपण पाहिल्या आहेत. याचा एक तत्काळ परिणाम असा असतो की, सत्ताधारी पक्षाची धोरण वा दृष्टी यांच्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यासाठी वा त्यांना प्रतिकार करण्यासाठी, किंवा विरोधकांनी समोर ठेवलेल्या पर्यायाची तपासणी करण्यासाठी मतदारांना अवकाशच उरत नाही. व्यापक पातळीवर विचार करता, निवडणुका म्हणजे केवळ व्यक्तिमत्त्वांची स्पर्धा झाली, तर त्यातून समाजातील व अर्थव्यवस्थेतील प्रभुत्त्व सत्ताधारी शक्तींना सोयीचं धोरणात्मक सातत्य टिकून राहील. परिणामी, सत्तासंबंधांमध्ये बदल घडवण्याची मतदारांची क्षमताच व्यवहार्यतः नाकारली जाते. क्षमताच खंगली तर लोकशाहीला काय अर्थ उरतो?

महापालिकाकरणामुळे मतदारांची कृती व हस्तक्षेप मतदारसंघाच्या पातळीपुरतेच मर्यादित राहातात आणि उपरोल्लेखित नकारात्मकतेला हातभारच लागतो. महापालिकाकरण झालेली राजकीय जाणीव स्थूल पातळीवर धोरणात्मक मुद्द्यांवरील चर्चा वगळून टाकते. विशिष्ट कार्यक्रम आणि कायदे, सरकारचं चारित्र्य,

असे सगळेच मुद्दे बाजूला सारले जातात. शिवाय, वरकरणी स्थानिक किंवा मतदारसंघापुरते भासणारे प्रश्न वैश्विक व रचनात्मक घटकांशी कसे जोडलेले असतात, हेही या जाणीवेमुळे लक्षात येत नाही. दिल्लीतील सत्ता अधिकाधिक दूरस्थ होत असतानाही लोक गल्लीच्या अवकाशामध्ये बंदिस्त राहातात. संसदीय लोकशाहीमध्ये दिल्लीतील सत्तेचे स्रोत गल्लीतच रुजलेले असतात, हे खरं; परंतु दिल्लीतील कृतींचा परिणाम गल्लीतील जीवनावर होत असतो, त्यामुळे दिल्लीपलीकडच्या जाणीवेने लोकांनी सक्रिय व्हायला हवं. लोकजाणीव मतदारसंघाच्या पातळीवर मर्यादित ठेवल्याने निवडणुकांमधून होणाऱ्या राजकीय शिक्षणालाही मर्यादा पडतात. लोकशाहीची एकंदरीत दिशा आणि आपल्या जीवनावर परिणाम करणाऱ्या शक्ती यांबद्दल मतदारांचं स्व-शिक्षण निवडणुकांच्या निमित्ताने होत असतं. या प्रक्रियेमध्ये राजकीय पक्ष व त्यांच्या प्रचारमोहिमा हे महत्त्वाचे घटक असतात. परंतु, महापालिकाकरण व राष्ट्राध्यक्षीय रचनेकडे कललेली व्यवस्था, यांमुळे राजकीय पक्षांच्या भूमिकेची आणि त्यांच्या एकूण प्रस्तुततेची हानी होते. जनतेशी सेंद्रियरित्या जोडलेल्या आणि विचारसरणीय आधार असलेल्या संघटना, हे राजकीय पक्षांचं रूप ओसरलं आहे, त्यामुळे उपरोल्लेखित दोन प्रवाह अधिक जोमाने पुढे आले हे खरं आहे. पण निवडणुकांसाठीच्या प्रचारमोहिमा आणि त्याभोवतीचं सार्वजनिक संभाषित यांमुळे सार्वजनिक कल्पनाविश्व अधिक खालावत गेलं.

एकूण निवडणुकीय प्रक्रियेमध्ये जाहीरनाम्याला अजिबातच महत्त्व उरलेलं नाही, हा या खालावलेपणाचा लक्षणीय दाखला आहे. राजकीय पक्षांच्या जाहीरनाम्यांची निर्मितीप्रक्रिया व त्यातील आशय याबद्दल नागरिकांनाही रस असल्याचं दिसत नाही, आणि राजकीय पक्षसुद्धा त्यांच्या प्रचारांमध्ये जाहीरनाम्याला मध्यवर्ती स्थान देत नाहीत. भारतीय जनता पक्षाने २०१४च्या निवडणुकांमध्ये मतदानाच्या पहिल्या दिवशी आपला जाहीरनामा प्रसिद्ध केला, यावरून ही परिस्थिती स्पष्ट होते. याला केवळ काही मोजके पक्ष अपवाद ठरणारे आहेत. जाहीरनाम्यांच्या अस्सलपणाविषयी व प्रामाणिकपणाविषयी नागरिकांना साधार शंका वाटते, त्यातूनच या घटकाविषयी लोक उदासीन झाले आहेत. पण तरीही राजकीय पक्षांच्या कार्यक्रमात्मक दृष्टिकोनाविषयीचं एक महत्त्वाचं विधान म्हणून जाहीरनाम्यांना महत्त्व आहे. जाहीरनाम्यांविषयी माध्यमांमधून पद्धतशीर चर्चा होत नाही आणि त्यातील आशयाविषयी पक्ष व मतदार यांच्यात सक्रिय संवाद घडत नाही, त्यामुळे निवडणुकीय स्पर्धेमधील कार्यक्रमात्मक दृष्टीचा पैलू परिघावर ढकलला जातो. कार्यक्रमात्मक दृष्टीमध्ये संकल्पनांची स्पर्धा अपेक्षित असते, विद्यमान परिस्थिती आणि सरकार व समाज यांचा भविष्यातील मार्ग यासंबंधीची चर्चा अपेक्षित असते. आज संकल्पनांसंबंधीची स्पर्धा अधिक प्रस्तुत झाली आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ- भारतीय जनता पक्ष यांच्या नियंत्रणाखालील सरकारला आणखी एक कार्यकाळ मिळाला, तर समाज व सरकार यांची भविष्यातील दिशा राज्यघटनेतील दृष्टीच्या पूर्ण विपरित असेल. या पार्श्वभूमीवर, २०१९ सालची निवडणूक ही स्वातंत्र्यानंतरची सर्वांत महत्त्वाची निवडणूक ठरेल, असं म्हणता येतं. अशा वेळी निवडणुकांसंबंधीचं सार्वजनिक संभाषित गांभीर्य राखणारं असावं, याची खातरजमा करण्याची जबाबदारी नागरिकांवर येते.

●

**परिवर्तनाचा वाटसरूसाठी लेखन पाठवताना**

आपले लेखन पाठवताना संपादनाच्या सोयीसाठी ते सुवाच्य अक्षरात लिहिलेले वा टंकलिखित वा संगणकाद्वारा मुद्रित केलेले असावेत. मुद्रित लेख एमएस वर्ड अथवा पेजमेकरमध्ये श्रीदेव ७-०७०८ या अथवा युनिकोड फाँटमध्ये पाठवावे.

# हे समुद्र कोणाचे? हे किनारे कोणाचे?

*मच्छिमारांचं पुनर्वसन त्यांच्या अधिकारांची बूज राखणारं असायला हवं, त्यात केवळ प्रतिकात्मकता असू नये.*

मुंबईतील वादग्रस्त किनारी रस्ता प्रकल्प आपल्या पिढीजात उपजीविकेला उद्ध्वस्त करेल, या मुद्द्यावरून स्थानिक मच्छिमारांनी या वादग्रस्त प्रकल्पाविरोधात गेली पाचहून अधिक वर्षं निदर्शनं सुरू ठेवली आहेत. आधुनिक शहरी अवकाश आणि परिघावरील रहिवासी यांच्यातील संघर्ष या शहरासाठी नवीन नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेने आपला निवारा हिरावू नये यासाठी प्रतिकार करणाऱ्या पदपथांवरील रहिवाश्यांनी १९८०च्या दशकात न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते- त्या 'ओल्गा टेलिस विरुद्ध मुंबई महानगरपालिका' खटल्यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने एक ऐतिहासिक निष्कर्ष काढला. भारतीय राज्यघटनेच्या अनुच्छेद २१मधील जगण्याचा अधिकार उपजीविकेच्या अधिकारापर्यंत विस्तारायला हवा, कारण जगण्याच्या साधनांशिवाय कोणतीही व्यक्ती जगू शकत नाही, असा अर्थ त्या वेळी न्यायालयाने मांडला होता. या निकालाला जेमतेम तीन दशकं झाली असताना, आता अनेक समुद्री मच्छिमार समुदायांच्या एतद्देशीय परिसंस्थेवर अस्थिरतेची तलवार टांगती आहे. राज्यातील व केंद्रातील सरकारं या मच्छिमारांच्या परिस्थितीबाबत उदासीन आहेत आणि तणाव कमी करण्यासाठी त्यांनी कोणतंही वस्तुस्थितीदर्शक स्पष्टीकरण दिलेलं नाही वा कोणताही हस्तक्षेप केलेला नाही. या परिस्थितीला न्यायव्यवस्थेने दिलेला प्रतिसाद तर धडधडीतपणे वैरभावी आहे.

वरळी कोळीवाडा नाखवा आणि वरळी मच्छिमार सर्वोदय सहकारी सोसायटी यांनी उपरोल्लेखित प्रकल्पाविरोधात दाखल केलेल्या याचिकेच्या सुनावणीवेळी मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केलं की, मच्छिमारांच्या पुनर्वसनाचा आराखडा समोर न ठेवल्याची जबाबदारी राज्य शासनाची आहे. पण मुळात ज्या प्रकल्पामुळे हा समुदाय असुरक्षित अवस्थेपर्यंत गेला आणि त्यांच्या पुनर्वसनाची वेळ आली, त्या प्रकल्पाबाबत मात्र न्यायालयाने अवाक्षरही काढलेलं नाही. लोकांच्या जीवनावर आणि उपजीविकेवर होणाऱ्या अशा आक्रमक भांडवली अतिक्रमणाला आळा घालण्यासाठी लोकशाहीतील परस्परांवर चाप ठेवणाऱ्या प्रक्रियांचा शोध घेणं ही आत्ताची मूलभूत गरज बनली आहे. उच्च न्यायालयाने पुनर्वसनाविषयी कळकळ दाखवली, पण त्यामध्ये अशा आक्रमकतेची अपरिहार्यता अप्रत्यक्षपणे स्वीकारलेली आहे. हे लोकशाही प्रेरणेचा भंग करणारं आहेच, शिवाय 'पुनर्वसन' या तत्त्वाचं सारही यातून निघून जातं. सरकारांनी लोकांच्या घटनात्मक अधिकारांचं उल्लंघन करू नये यासाठीचं संरक्षक तत्त्व म्हणून 'पुनर्वसन' वापरलं जातं, अशा उल्लंघनाची सोय म्हणून त्याकडे पाहणं योग्य नाही.

किनारी रस्ता प्रकल्प हा देशातील सर्वांत महागडा पायाभूत रचना प्रकल्प आहे. या प्रकल्पामध्ये प्रति किलोमीटर १,२०० कोटी रुपये इतका प्रचंड युनिट खर्च येणार आहे, पण निवडणुकीय भाषणबाजीपलीकडे याबाबतीत कोणतीही कार्यक्षमता दाखवण्यात आलेली नाही. या मार्गामुळे शहरातील रस्त्यांवरची 'कोंडी कमी' होईल, हा दावा म्हणजे 'झाकली मूठ सव्वा लाखाची'सारखा प्रकार आहे, कारण या प्रकल्पाचा प्रस्ताव तयार करण्यापूर्वी कोणतंही सखोल वाहतूक सर्वेक्षण करण्यात आलं नव्हतं. रस्त्यांवरील वाहतुकीची कोंडी कमी करणं हा खरा हेतू असता, तर शहरातील मेट्रो रेल्वेचं कामपूर्ण करण्याला आधी गती द्यायला काय हरकत आहे? किनारी रस्ता हा काही शहरातील पायाभूत प्रश्नांवरचा अंतिम तोडगा असू शकत नाही. हे प्रश्न वैविध्यपूर्ण आहेतच, शिवाय अनेकदा ते परस्परवर्जक आहेत. उदाहरणार्थ, किनारी रस्त्यांमुळे लोकांना सहज जोडणीची लाभ मिळाला, तरी त्याचा

जवळपास उघड नैसर्गिक परिणाम म्हणून शहराच्या परिसंस्थेची हानी त्यांना सहन करावी लागेल.

या निवडी अवघड आहेत आणि त्यांचं स्पष्टीकरण केवळ विकासातील संदिग्धता म्हणून करता येणार नाही. गेल्या दोन दशकांमध्ये आणि विशेषतः गेल्या पाच वर्षांमध्ये या देशातील किनारपट्टी विकासाचे पुरावे असे संकेत देणारे आहेत की, कॉर्पोरेट क्षेत्र व राजकीय नेते यांच्यातील संगनमताचं निर्लज्ज दर्शन घडवणाऱ्या पक्षपाती कल्याणकारी राजकारणामुळे ही तडजोड केली जाते. गुजरातपासून केरळपर्यंत किनारपट्टीवरील बरीच जमीन कॉर्पोरेट क्षेत्राच्या नियंत्रणाखाली आहे. विशेष आर्थिक क्षेत्र, किनारपट्टी नियमन क्षेत्र किंवा किनारपट्टी व्यवस्थापन क्षेत्र यांसारख्या योजनांद्वारे सरकार स्वतःच नियमनांचं उल्लंघन करतं आणि ही जमीन कॉर्पोरेट क्षेत्राच्या हातात सोपवतं. दुसऱ्या बाजूला, या अतिक्रमणामुळे पारंपरिक मच्छिमार समुदायांना त्यांच्या पूर्वजांच्या जमिनीवरून विस्थापित व्हावं लागतं. त्याचबरोबर अतिसक्रिय औद्योगिक कामांमुळे व बांधकामांमुळे या क्षेत्रांमधील मच्छिमारांची पारंपरिक उपजीविकाही कोलमडली आहे.

'निळ्या अर्थव्यवस्थे'च्या उक्तीचं पांघरुण घेऊन येणारी सरकारी धोरणं समुद्राला 'सामायिकतेपासून बाहेर खेचतात' आणि मासेमारी व्यवस्थापनाच्या पारंपरिक (स्थानिक) संस्थांना विस्थापित करतात, हे नाकारता येणार नाही. कॉर्पोरेटस्नेही धोरणांमध्ये समुद्र व किनारपट्टी या आर्थिक संधीच्या आणि वाढीच्या नवीन आघाड्या मानल्या आहेत, त्यामुळे समुद्री संसाधनांवरील खाजगी कब्ज्याने पारंपरिक मच्छिमारांना त्यांच्या देशी मासेमारीच्या जागांवर पाणी सोडावं लागतं आहे.

किनारपट्टी व्यवस्थापन क्षेत्र असो वा सागरमाला प्रकल्प असो– विद्यमान सरकारच्या मासेमारी क्षेत्राशी संबंधित सर्व योजना 'निळ्या अर्थव्यवस्थे'चा ओझरता अथवा अभिनिवेशी उल्लेख करतात. परंतु, आश्वासित परिणामकारकतेविषयी कोणतीही सर्वांगीण मार्गदर्शक तत्त्वं या योजनांनी वा धोरणात्मक दस्तावेजांनी घालून दिलेली नाहीत. या क्षेत्राच्या अंगभूत बहुविधतेची दखलही या धोरणांमधून घेतली जात नाही, कारण तसं केल्यास 'विकासा'च्या नावाखाली मूळ रहिवाश्यांना त्यांच्या जमिनीवरून हुसकावल्याबद्दल अस्वस्थ प्रश्न उपस्थित केले जातील. अशा संदर्भात, आपल्या नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची खात्री देऊ न शकणाऱ्या सरकारला उत्तरदायी ठरवणाऱ्या आवाजांना दाबण्यासाठी 'पुनर्वसना'चा वापर केला जाऊ शकतो. ●

---

## जीवन आणि मृत्यू यांच्यातील पूल

*मुंबईतील पूल कोसळण्याच्या घटनेमुळे नागरी नियोजनातील त्रुटी उघड झाल्या आहेत.*

पूल दोन बाजूंना जोडण्यासाठी असतो. नद्या, रस्ते, आणि प्रवासाच्या वाटेतील अडथळे पार करण्यासाठी लोकांना पूल मदत करत असतात. परंतु, मुंबईतल्या पुलांच्या बाबतीत मात्र परिस्थिती याच्या उलटी आहे. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) रेल्वेस्थानकाच्या बाहेरचा पादचाऱ्यांसाठीचा पूल १५ मार्च २०१९ रोजी कोसळला; या अपघातामध्ये सहा जण मृत्युमुखी पडले आणि ३२ जण जखमी झाले. 'पूल' हा शब्द माध्यमांमधील मथळ्यांद्वारे अनेकदा 'दुर्दैवी घटना' व 'मृत्यू' या शब्दप्रयोगांशी जोडला जातो आहे. नागरी पूल व उड्डाणपूल यांच्याशी निगडित समस्या केवळ नागरी नियोजन व शासन यांच्यापुरत्या मर्यादित नाहीत, तर राजकीय उद्दिष्टं आणि नागरी नियोजनातील नागरिकांचा सहभाग हेही संदर्भ इथे महत्त्वाचे ठरतात.

यातील तत्काळ समोर येणारा पैलू उपरोध अधोरेखित

करणारा आहे : पादचारी लोक रस्ता पार करताना अपघातांमध्ये बळी पडू नयेत, यासाठी सीएसएमटी स्थानकाजवळ रस्त्यावरून हा पूल बांधण्यात आला, आणि या सुरक्षिततेसाठीच्या सुविधेनेच अनेक पादचाऱ्यांचा जीव घेतला. या घटनेनंतर माध्यमांमधून समोर आलेली वस्तुस्थिती आता भारतीयांना धक्कादायक उरलेली नाही. काही महिन्यांपूर्वी बृहन्मुंबई महानगरपालिकेने एका खाजगी कंपनीकडून या पुलाचं रचनात्मक परीक्षण करून घेतलं होतं, तेव्हा या खाजगी संस्थेने संबंधित पुलाचं आरोग्य धडधाकट असल्याचा अहवाल दिला होता. नियमित काळाने रचनात्मक परीक्षण करण्याची जबाबदारी असलेल्या अभियंत्यांच्या या खाजगी कंपनीच्या संचालकाला आता अटक करण्यात आली आहे. यामध्ये महानगरपालिका किंवा रेल्वे कर्मचाऱ्यांपैकी कोणी 'सहभागी' आहे का, याचा 'तपास' पोलीस करत असल्याचंही सांगितलं जातं आहे. हे उपरोध आणखी गडद करणारं आहे. मानवी जीवनाच्या सुरक्षिततेशी संबंधित प्रक्रिया केवळ एका रचनात्मक अभियंत्याच्या अहवालावर विसंबून असावी आणि त्यात आणखी कोणतीच परस्पर अंकुश ठेवणारी यंत्रणा समाविष्ट नसावी, हे मान्य करणं अवघड आहे. उत्तरदायित्वाची सक्षम यंत्रणा थाऱ्यावर असेल तर कोणी निष्काळजीपणा असा अहवाल सादर करण्याची हिंमत करेल का?

भारताच्या नागरी नियोजनातील आणखी एक अस्वस्थ करणारा पैलू यातून पुढे येतो. नागरिकांची व प्रवाश्यांची गरज कोणती आहे, यावरच खरोखर हे नियोजन आधारलेलं असतं का, की राजकीय व्यवहार्यता व कंत्राटदारांची हाव या प्रेरणांनी ही प्रक्रिया पार पडते? प्रवाश्यांच्या वापराची कोणतीही फिकीर न करणाऱ्या पायाभूत रचना उभारल्या जाण्याचे प्रकार तर सर्रास दिसतात. मुंबईतील अनेक स्काय-वॉक मार्ग आणि मोनोरेल ही याची लख्ख उदाहरणं आहेत. अशा प्रकल्पांसाठी 'काळ्या यादी'तील कंत्राटदारांना कशा प्रकारे काम दिलं जातं, हे माध्यमांनी वेळोवेळी उघडकीस आणलेलं आहे. नागरिकांच्या हितापेक्षा स्वार्थी उद्दिष्टांवर नजर ठेवून असणाऱ्या राजकारण्यांच्या सुरात सूर मिळवणारे अभियंते व वास्तुरचनाकार मोठ्या संख्येने या देशात आहेत, ही लज्जास्पद बाब आहे. त्यांची अभियांत्रिकी आणि वास्तुरचनाविषयक कौशल्यं लोकांच्या सेवेसाठी उपयोगी पडायला हवीत, छुप्या हितसंबंधांना सहायक ठरणाऱ्या लोकानुनयी उपक्रमांना त्यांनी हातभार लावणं योग्य नाही. सर्वोत्तम सेवा देऊ शकणारी उत्कृष्ट व्यावसायिक गुणवत्ता असणाऱ्यांपेक्षा कमी रकमेची बोली लावणाऱ्यांना प्रोत्साहन देणारी नागरी धोरणं आपल्याकडे राबवली जातात. बहुतांश सार्वजनिक पायाभूत प्रकल्पांमध्ये अशाच प्रकारची वृत्ती कार्यरत असल्याचं दिसतं.

ऑटोमोबाइल-केंद्री, सार्वजनिक वाहतुकीच्या विरोधी आणि खाजगी कंत्राटदारांच्या हितांच्या बाजूने कललेली धोरणं धोकादायक ठरतात, असा इशारा नागरी नियोजन कार्यकर्त्यांनी वेळोवेळी दिला आहे. मुळात या देशात वेगाने होत असलेलं नागरीकरणच इतकं अनागोंदीचं आहे, की नागरी पायाभूत रचनाही स्वाभाविकपणे संदर्भाधिष्ठित व सार्वजनिक गरजांना ध्यानात घेऊन उभारल्या जात नाहीत, तर तुटक स्वरूपात व यादृच्छिक पद्धतीने हे बांधकाम घडतं. अशा परिस्थितीत भ्रष्टाचार आणि उत्तरदायित्वाचा अभाव वाढत जातो, हे वेगळं नोंदवायला नकोच. नागरी वाहतूक व पर्यावरणीय तज्ज्ञांनी आक्षेप नोंदवूनही मुंबईत मेट्रो व्यवस्थांवर आणि किनारपट्टी रस्ता प्रकल्पावर लक्ष केंद्रित करण्यात आलं. हीच कहाणी कमी-अधिक फरकाने देशभर उलगडताना दिसते.

मुंबईत अंधेरी रेल्वे स्थानकाशेजारचा एक पूल ३ जुलै २०१८ रोजी रुळांवरच कोसळला, त्यात दोन व्यक्तींचा मृत्यू झाला. त्यानंतर तत्काळ दोषारोपांची मालिका सुरू झाली आणि त्यातून असं समोर आलं की, रेल्वे प्रशासनाने २०१४ ते २०१७ या काळात संबंधित पुलाची तपासणी केली असली, तरी ही तपासणी

दाखवण्यासाठी आवश्यक दस्तावेजीकरण केलेलं नव्हतं. तत्पूर्वी, २०१७ साली एलफिस्टनमधील रेल्वे पुलावर झालेल्या चेंगराचेंगरीत २३ जणांचा मृत्यू झाला आणि अनेक जण जखमी झाले. या भागातील प्रचंड आणि वाढत्या प्रवासी लोकसंख्येशी सुसंगत पद्धतीने जमिनीचा वापर करण्यात प्रशासनाला पूर्ण अपयश आलं असल्याचं या भयंकर चेंगराचेंगरीतून स्पष्ट झालं.

अलीकडच्या पूल कोसळण्याच्या घटनेला आणखीही दोन महत्त्वाच्या बाजू आहेत. एक, या अपघाताला वाढती लोकसंख्या हे कारण असल्याचा दावा शिवसेनेने केला आहे. मुंबईत इतकी शतकं स्थलांतरित लोकसंख्या येते आहे आणि या शहरातील रोजगाराच्या संधींचा शोध घेत लोक इथे येतच राहाणार आहेत. शहराच्या ताज्या विकास आराखड्यामध्येच ऐंशी लाख नवीन नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन आहे. यातून प्रवासी लोकसंख्येत होणारी वाढ नागरी नियोजनावेळी लक्षात घ्यायला नको का? शिवाय, गेल्या दोन वर्षांमध्ये अशा प्रकारची ही तिसरी शोकात्मिक घटना घडूनही त्याबद्दल लोकांचा आक्रोश ऐकू येत नाही वा निदर्शनंही होत नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. हे अपघात आणि त्यासोबत होणारे मृत्यू व जखमा हे सगळं 'विकासा'च्या आनुशंगिक नुकसानीचा भाग आहे, हे जणू काही लोकांनी स्वीकारून टाकलं आहे. नागरिकांच्या काही गटांनी निदर्शनं केलीच, तर सरकार त्याकडे सरळ दुर्लक्ष करतं आणि वादग्रस्त पायाभूत प्रकल्प सुरूच ठेवतं.

पायाभूत सुविधा उभारण्याचं काम सार्वजनिक सेवेचं आहे, त्याकडे कंत्राटदारांना व इतर पूरक व्यावसायिकांना खैरात करणारी कृती म्हणून पाहू नये. असं घडायचं असेल तर नागरिकांनी प्रश्न विचारायला हवेत आणि त्यांची उत्तरं मिळावीत अशी मागणी सातत्याने करायला हवी. ●

---

## निकालामधील घातक त्रुटी

*स्वतःचाच निकाल मागे घेण्याची सर्वोच्च न्यायालयाची कृती पाहता देहदंडाच्या शिक्षेला स्थगिती देण्यासाठी केला जाणारा युक्तिवाद उचित ठरतो.*

कनिष्ठ न्यायालयाने एखाद्या अपराध्याला दिलेली देहदंडाची शिक्षा सर्वोच्च न्यायालयाने मागे घेतल्याचे प्रसंग अनेकदा घडत आलेले आहेत. कनिष्ठ न्यायालयांनी देहदंड दिलेल्या व्यक्तींना सर्वोच्च न्यायालयाने अगदी निर्दोष ठरवल्याच्या घटनाही घडलेल्या आहेत. परंतु, सर्वोच्च न्यायालयात एका आरोपीला देण्यात आलेली देहदंडाची शिक्षा पुन्हा याच न्यायालयाने मागे घेतल्याची घटना पहिल्यांदाच घडली आहे. 'अंकुश मारुती शिंदे विरुद्ध महाराष्ट्र शासन' या खटल्यामध्ये हा अभूतपूर्व प्रसंग घडला.

या खटल्यातील भयंकर घातक घटनांची मालिका खूप मोठी आहे : दारिद्र्याशी झगडणाऱ्या एका कुटुंबावर अज्ञात हल्लेखोर तुटून पडतात, घर लुटतात, मारहाण करतात आणि त्याच भयंकर रात्री या कुटुंबातील व्यक्तींचा खून करतात. या प्रकरणातील संशयितांचा शोध घेण्याऐवजी सहा निरपराध पुरुषांविरोधात पोलीस पूर्णतः बनावट खटला उभा करतात. हे सहा जण कथित 'गुन्हेगारी जमातीं'मधील असतात, एवढं एकच कारण यामागे असतं. त्यांना गुन्ह्याच्या ठिकाणाशी जोडणारा किंवा या प्रकरणात त्यांचा दूरदूरचाही संबंध असल्याचं सिद्ध करणारा कोणताही पुरावा सापडत नाही. 'प्रत्यक्षदर्शी साक्षीदार' आपली निवेदनं परिस्थितीनुसार वारंवार बदलतात. परंतु, सुनावणी न्यायालयात, उच्च न्यायालयात आणि सर्वोच्च न्यायालयातही अत्यल्प व अविश्वासार्ह 'पुराव्या'वरून या सहा जणांना धक्कादायकरित्या दोषी ठरवलं जातं.

दशकभरापेक्षाही अधिक काळ या व्यक्ती मृत्यूची टांगती तलवार घेऊन तुरुंगात शोचनीय एकाकी आयुष्य घालवतात, त्यांच्यावर अत्याचार होतात. यातील एक आरोपी कथितरित्या गुन्हा घडला तेव्हा अल्पवयीन असल्याचं सिद्ध होतं, पण कोणतंही न्यायालय या तपशिलाकडे अजिबात लक्ष देत नाही. यातील तिघांची देहदंडाची शिक्षा मुंबई उच्च न्यायालय कमी करतं तेव्हा सर्वोच्च न्यायालय त्यांची बाजू ऐकूनही न घेता उच्च न्यायालयाचा निर्णय रद्द करतं आणि देहदंडाची शिक्षा कायम ठेवतं. मग खुल्या न्यायालयीन सुनावणीशिवायच या सर्वांची पुनर्विचार याचिका सर्वोच्च न्यायालय फेटाळून लावतं.

सर्वोच्च न्यायालयामध्ये पूर्णतः वेगळ्या खंडपीठासमोर उपचारात्मक याचिका दाखल केली गेली तेव्हा कुठे या प्रक्रियेतील 'त्रुटी' निदर्शनास आली आणि न्यायचक्रं फिरायला लागली. देहदंडाच्या खटल्यांमध्ये पुनर्विचार याचिकांची सुनावणी खुल्या न्यायालयात घेतली जावी, जेणेकरून या प्रक्रियेत पारदर्शकता राहील, असा नियम सर्वोच्च न्यायालयाने घालून घेतला होता, त्याचं जोरकस समर्थनच या प्रकरणातून होतं. अखेरीस, या खटल्यातील सर्व आरोपींना सर्वोच्च न्यायालयाने दोषमुक्त केलं आहे, आणि त्यांना नुकसानभरपाई द्यावी असे आदेश महाराष्ट्र शासनाला देण्यात आले आहेत. अशा बेदरकार प्रमादाबद्दल पोलिसांना उत्तरदायी ठरवण्याचा प्रयत्नही सर्वोच्च न्यायालयाने केला. पण या प्रकरणातील स्वतःच्या चुकीची कोणतीही कबुली न्यायालयाने दिलेली नाही.

'दुर्मिळात दुर्मीळ प्रकरणां'मध्येच देहदंडाची शिक्षा दिली जावी, आणि शिक्षा देण्यापूर्वी संबंधित प्रकरणातील सर्व सौम्य व गंभीर बाजू काळजीपूर्वक तपासल्या जाव्यात, या निकषावर देहदंडाचं समर्थन करायची सवय सर्वोच्च न्यायालयाला लागलेली आहे. वास्तवात मात्र कायदा तत्काळ दूर सारायची न्यायालयाची तयारी असल्याचं दिसतं. उदाहरणार्थ, 'निर्भया' प्रकरणात दोषींना देहदंड देणारा निकाल अशी शिक्षा सुनावण्याच्या बाबतीत कायद्यावर भर देण्यापेक्षा भावनोत्कट वक्तृत्वावर भर देणारा आहे. अंकुश शिंदे यांच्या खटल्यात देहदंडाची शिक्षा रद्द करणाऱ्याच खंडपीठाने त्याच दिवशी दुसऱ्या एका खटल्यात देहदंड सुनावला. त्या प्रकरणात देहदंडाची शिक्षा का द्यायला हवी, याचं कोणतंही ठोस विश्लेषण वा युक्तिवाद संबंधित निकालपत्रामध्ये नाही (खुशविंदर सिंग विरुद्ध पंजाब शासन).

न्यायालयाची बाजू समजून घ्यायची तर हे नमूद करायला हवं की, अलीकडच्या काळात सर्वोच्च न्यायालयाने सुनावणीला आलेल्या जवळपास सर्वच देहदंडाच्या शिक्षा कमी केलेल्या आहेत (उदाहरणार्थ, २०१८मध्ये १२ पैकी ११ देहदंडाच्या शिक्षा कमी झाल्या), परंतु सुनावणी न्यायालयं मात्र कधी नव्हे एवढ्या विकृतपणे देहदंडाबद्दल उत्साही झालेली आहेत. दिल्लीस्थित राष्ट्रीय विधी महाविद्यालयाने देहदंडाविषयीच्या वार्षिक सांख्यिकीबद्दल तयार केलेल्या अहवालानुसार, २०१८ या वर्षात सुनावणी न्यायालयांनी दिलेल्या देहदंडाच्या शिक्षांची संख्या २०००नंतरची सर्वाधिक आहे. अंकुश शिंदे प्रकरणातील तपास, सुनावणी व निकालांची गुणवत्ता बघितली, तर याच न्यायालयांनी देहदंडाची शिक्षा दिलेल्या अनेक प्रकरणांमध्ये गंभीररित्या सदोष सुनावण्या झाल्या असाव्यात, असं मानता येतं.

तरीही, न्यायालयांनी देहदंडाची शिक्षा द्यावी, अशी जनतेकडून होणारी रक्तपिपासू मागणी काही कमी होताना दिसत नाही. सर्व विचाररंगांचे राजकारणी अशा मागणीला आनंदाने पाठिंबा देतात. कठोर गुन्हेगारांना शिक्षा देण्यापेक्षा पीडित तयार करण्यामध्येच जास्त योगदान देणारी मोडकळलेली फौजदारी न्यायव्यवस्था किती लहरीपणे वागते याबद्दल हे राजकारणी निष्काळजी वा बेफिकीर असतात. कनिष्ठ पातळीवरील न्यायालयं लोकभावनेनुसार कार्यवाही करण्यात धन्यता मानतात– सरकारी पक्षाच्या चुका उघड दिसल्या किंवा बचावकर्त्यांकडे योग्य बचाव करण्याची क्षमता नसली,

तरी ही न्यायालयं मुक्तपणे देहदंडाची शिक्षा देत राहातात. अशा वेळी याचिका न्यायालयांनी अन्याय दूर करण्यासाठी व त्यावर उपाय करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत, परंतु शिंदे प्रकरणात दिसल्याप्रमाणे ही न्यायालयंही निर्दोष नाहीत. शेवटी, देहदंड झालेल्या व्यक्तींची निर्दोष मुक्तता झाली किंवा त्यांची देहदंडाची शिक्षा कमी झाली, तरी फौजदारी गुन्हेगारी न्यायव्यवस्थेमधील अमर्याद विलंब आणि दोषपूर्ण निर्णयप्रक्रिया यांमुळे या व्यक्तींना सहन करावा लागलेला मनस्ताप क्वचितच दूर होतो.

फौजदारी न्याय व्यवस्थेची सद्यस्थिती पाहता, देहदंडाची शिक्षा म्हणजे संस्थात्मक स्वरूपाचा खूनच ठरतो, आणि यातील पीडित हे कायमच दबलेल्या आणि वंचित समाजघटकांमधून आलेले असतात. नैतिकदृष्ट्या योग्य कृती करण्याची इच्छा राजकीय नेतृत्वाकडे नाही, त्यामुळे सर्वोच्च न्यायालयच या वास्तवाकडे डोळे उघडून पाहील आणि देहदंडावर तत्काळ स्थगिती आणेल, अशी आशा करणेच केवळ आपल्या हाती उरते.

●

## प्रस्तावित वैदिक शिक्षणामागचा छुपा हेतू

*जातव्यवस्थेच्या उच्चाटनासंदर्भात वैदिक शिक्षणातून कोणते तर्क लढवले जातात?*

वैदिक शिक्षणाला नवसंजीवनी देण्यासाठी व त्याचं अध्यापन करण्यासाठी 'भारतीय शिक्षण मंडळा'च्या प्रस्तावित स्थापनेची घोषणा अलीकडेच करण्यात आली. नेहमीप्रमाणे या घटनेचं काहींनी समर्थन केलं आणि काहींनी त्याबाबत शंका उपस्थित केल्या. विद्यार्थ्यांनी वैदिक संस्कृतीविषयी शिकावं, त्याचप्रमाणे हिंदू धर्मातील मुख्यप्रवाही वाङ्मयीन संहिता व पद्धतींशी त्यांचा परिचय व्हावा, या दृष्टीने एक पाऊल म्हणून हा उपक्रम सुरू होत असल्याचं मानलं जातं आहे. विचारसरणीय मुद्दे बाजूला ठेवले, तरी या विषयाचं अध्यापन करण्यासाठी उभे राहणारे शिक्षक, विद्यार्थ्यांकडून असलेल्या अपेक्षा आणि शाळांमध्ये व महाविद्यालयांमध्ये धार्मिक अभ्यास शिकवल्याचे परिणाम, यांबद्दल आपण थेट प्रश्न उपस्थित करू शकतो.

एक, आपल्या शिक्षण व्यवस्थेचा भाग म्हणून वेद शिकवायचे असतील, तर त्यासाठी शिक्षकांचा वेदांशी चांगला परिचय असायला हवा आणि वेद शिकून घेण्यासाठी त्यांना मुभा मिळायला हवी. पण वेद शिकण्यावर निवडक बंदी असल्यामुळे हा अभ्यासक्रम शिकवण्यासाठी केवळ द्विज वर्गातीलच व्यक्ती मिळतील का? देशात अनेक ठिकाणी वेदपाठशाळा आहेत आणि तिथे सामाजिक उतरंडीमध्ये उच्च स्थानी असलेल्या विशेषाधिकारी गटांमधील केवळ मुलग्यांना व पुरुषांनाच प्रवेश दिला जातो, हा या पाठशाळांचा मूलतः जातीय पैलू आहे. हे विशेषाधिकारी गट जात प्रथेचं कठोरपणे पालन करतात आणि 'पौरोहित्या'साठी त्यांची तयारी सुरू असते. हा मुद्दा महत्त्वाचा आहे, कारण पौरोहित्य न करणाऱ्या ब्राह्मण समुदायाला विधींचा फारसा पाठपुरावा करावा लागत नाही, पण पुरोहित वर्ग दिवसभरात मोठ्या संख्येने विधी करतो.

असे शिक्षक असतील, तर त्यांच्यासाठी शाळांमध्ये व महाविद्यालयांमध्ये विशेष ठिकाणं/खोल्या असाव्या लागतील, त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या ठिकाणावरून जातीय विभागणी सुरू राहील आणि धार्मिक प्रथा या अवकाशांमध्ये थेट समाविष्ट होतील. ब्राह्मण्य हे रुढी-प्रथांमध्ये खोलवर बुडालेलं आहे, हे लक्षात ठेवायला हवं. वेदशिक्षण घेणारे विद्यार्थीसुद्धा ब्राह्मणी प्रथांचं पालन करणार आहेत का? तसं असेल तर याचे समाजातील जातीय समीकरणांवर कोणते परिणाम होतील?

कारण काहीही असो, पण आपली शिक्षण व्यवस्था

हिंदू धर्माच्या विरोधात पूर्वग्रह राखणारी आहे, आणि त्यामध्ये दुरुस्ती होण्याची गरज आहे, या धारणेच्या आधारावर हा प्रस्ताव मांडला जात असल्याचं दिसतं. असं असेल तर, आपली शिक्षण व्यवस्था इतर धर्मांबाबतही तितकीच पूर्वग्रहदूषित असल्याचा अर्थ निघतो. तथाकथित इहवादी शिक्षणाला समाजाच्या सांस्कृतिक व धार्मिक पैलूंना कसं हाताळायचं ते कळत नाही, असं आहे का? तसं असल्यास धार्मिक व सांस्कृतिक अभ्यासाच्या विद्याशाखांना गांभीर्याने घेऊन समस्येवर तोडगा काढण्याची गरज आहे. आपल्या कोणत्याही आधुनिक शैक्षणिक संस्थांमध्ये सुस्थापित धार्मिक अभ्यास केंद्र नाही, ही दुर्दैवी अवस्था आहे. असे विभाग भारताबाहेरच्या ठिकाणी असतील तर त्यांच्या धर्मांविषयी बहुतांश अभ्यास तिथे केला जातो, किमान इंग्रजी माध्यमात हे घडतं.

यात आणखी एक चिंता करण्यासारखी गोष्ट आहे. 'बालकांना मोफत व अनिवार्य शिक्षणाचा अधिकार अधिनियम' या कायद्याने केलेली 'हानी' या नवीन निर्णयाने निवळेल, असं काही समर्थकांना वाटतं. यातून सदर अभ्यासक्रमामागील छुपा हेतू वा सहेतूक कार्यक्रम समोर येतो. शिक्षणाधिकार अधिनियमनाने 'हिंदूंनी चालवलेल्या शैक्षणिक संस्थां'ना हानी पोचवली, ही धारणा वस्तुस्थितीलाही धरून नाही आणि हा अधिनियम कोणत्या ना कोणत्या मार्गाने केवळ इतर धर्मांमधील गरीब विद्यार्थ्यांपुरताच आहे, हे बनावट गृहितक सदर धारणेच्या पायाशी आहे. (या धारणेत जातीविषयीचंही गृहितक लपलेलं आहे). आणि गरीब विद्यार्थी हिंदू असतील, तरी त्यांना वैदिक सभ्यतेचे वारसदार मानलं जात नाही. त्यामुळे वैदिक शिक्षणाची सुरुवात म्हणजे ब्राह्मणी शिक्षणाचा शिरकाव आहे, या शंकेवरच यातून शिक्कामोर्तब होतं.

या उपक्रमाला कवटाळणारे लोक कोण असणार आहेत? यातून हिंदूंना प्रेरणा मिळेल, असा सरकारचा समज असेल, तर तो गैरसमजच ठरणार आहे. हिंदूंमधील मध्यम, उच्च आणि महत्त्वाकांक्षी वर्ग (विशेषतः द्विज उतरंडीच्या सर्वोच्च स्थानी असलेले घटक) आपल्या मुलांना इतर कशाहीपेक्षा मिशनरी व आंतरराष्ट्रीय शाळांमध्ये पाठवताना दिसतात. शिवाय, वैदिक शिक्षण देणाऱ्या अनेक शाळा आधीपासूनच आहे, परंतु जातीय उतरंडीमध्ये विशेषाधिकारी स्थानावर असलेल्यांपैकी आणि इतरही हिंदूंपैकी फारच मोजके लोक आपल्या मुलांना या शाळांमध्ये पाठवतात. तर, या उपक्रमाचं मुख्य लक्ष्य हिंद्वेतर आणि ब्राह्मणेतर घटक असावेत, असं दिसतं. आपल्या सामाजिक रचनेतील हिंद्वेतरांना आपल्या संस्कृतीच्या थोरवीचं दर्शन घडवणं आणि तसं करताना छुपेपणाने 'वैदिक' म्हणजे 'भारतीय' असं समीकरण प्रस्थापित करणं, हा या वैदिक शिक्षणामागचा मुख्य उद्देश दिसतो. तत्त्वज्ञान, भाषा व कला यांमध्ये वैदिक कालखंडाने दिलेल्या योगदानाचं मूल्य अमान्य करता येणार नाही, परंतु सर्व भारतीयांना (यात ब्राह्मणेतर हिंदूही आले) त्यांचा वारसा वैदिक आहे, असं सुचवणारी व्यवस्था आपण तयार करता कामा नये.

आपल्या शिक्षण व्यवस्थेवर अजूनही भाबड्या युरोपकेंद्री विवेकाचं प्राबल्य आहे, त्यामुळे अशा उपक्रमाचा राजकीय साधन म्हणून वापर केला जाऊ शकतो, हेही इथे नमूद करायला हवं. या शिक्षण रचनेमुळे आणि पाश्चात्त्येतर स्रोतांविषयी ही व्यवस्था दाखवत असलेल्या साशंकतेमुळे विद्यार्थी आणि पालक खरोखरच त्रस्त झाले आहेत. त्यामुळे, आपल्या शिक्षणव्यवस्थेच्या आशयाविषयी आणि त्यातील पद्धतींविषयी चिंतीत असलेल्या आपल्या सर्वांना हा उपक्रम म्हणजे धोक्याची घंटा आहे. पाश्चात्त्येतर समाजांच्या अनुभवांबाबत आणि विवेकाबाबत संवेदनशीलता बाळगणाऱ्या वेगवेगळ्या परिप्रेक्ष्यांना आपली विद्यमान शिक्षणव्यवस्था सामावून घेईल, अशी आशा आपण करूया.

●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (१६ मार्च व २३ मार्च २०१९ या अंकातून)